2309
काव्य

REFBK-0021594
REFBK-0021594

२९५८४
काव्य
सं ६२१

अरुण कोलटकरच्या
कविता

REFBK-0021594
REFBK-0021594

प्रास १ ला

अरुण कोलटकरच्या कविता

© १९७७ अरुण कोलटकर

पहिली खेप
होळी शके १८९८

मुखपृष्ठ
वृंदावन दंडवते

मांडणी
अशोक शहाणे

प्रकाशक
अशोक शहाणे
३९ नाथमाधव
कांदिवली पूर्व
मुंबई ४०००६७

मुद्रक
कृष्णा करवार
मोहन मुद्रणालय
ॲक्मे इस्टेट
शिवडी पूर्व
मुंबई ४०००१५

किंमत
वीस रुपये

# अरुण कोलटकरच्या कविता

ग्रहालय ठाणे
दा. क.
शाखा (स्थळ प्रत)

प्रास प्रकाशन

जन्मजात इमारत
जाते उभारत
पुंगीच्या कद्यातील दोरासारखी
किंवा सखल
विहिरीने उचल
पावसाळ्यात ध्यावी बळावून तशी.
वेळाच्या चोर-
हातपायानी दोर
पकडून सरसरत तुलसीदास घेतो
उन्मीलन-उडी
खोलीत. कडी
खुणेला ठेवलेल्या खुडणाऱ्या खोलीला
घालून इमारत
जाते ओसरत.
निराधार खोली म्हणते कसा आलास ? डोकावता
खोल खाली शेपटी-
वर राहिलेला दृष्टीस
भिनतो अभावाचा उभा साप केसाळ.

पायाळू इमारतीनं मला विचारलं, " आमचा
पाय का धरला ? "
मी म्हणालो, " आमच्या
अंगणात का आला ? "
म्हणते कशी, " तुमचं
अंगण केवढं ? "
अग टवळे
माहीत आहे मला ते सगळं

मीच उलटा तिच्या उंबरठ्याला
नाल मारला.
आणि रात्री झोपता झोपता म्हणालो
बघू आता कुठं जाती

पण गड्या
इमारतीनं आपल्या
पुढच्या दरवाज्याला आतून
कडी लाऊन घेतली
व मागच्या दिंडीदरवाज्यातून
ती बाहेर पडली

इमारत अभिसारिका झाली
अन् आपल्या जाराकडं निघून गेली
इमारत अभिसारिका झाली :
मी चंद्रमौळी.

# घोडा

बेहद्द नाममात्र घोडा.
त्याचा उगम आणि विकास गूढ
कॅन्सरसारखा. त्याच्या
हाडामासाने मातीशी द्रोह पत्करलेला.
त्याच्या खोडदौडीच्या वळणदार वणव्याला
वेग एकाद्या हल्ल्याच्या अफवेचा.
त्याच्या ओवीबद्ध टापांचे
खणखणीत बोल
भाकरतुकड्याइतके ढळढळीत.

पण विलीन पाषाणयुगांचे जरव्खड राजेरजवाडे
( त्यांच्या म्यानातच अमरत्व गंजलेले )
नकली नाण्यांच्या दहशतवादी सुळसुळाटाने
डोंगर हादरले अर्थव्यवस्थेसारखे
पाहून त्याच्या यमक्या टापांचे कथनकौशल्य
परंपरागत निद्रेतून उठले
सिंहासन सोडून परागंदा झाले.

स्फोटक सिगारेटप्रमाणे निरागस दिसणारी
नाणी मात्र तशीच पडून राहिली
घोड्याच्या टापानी वाटेवर उधळलेली.

एक उत्तर
सूर्याहून प्रखर
व त्रोटक
काव्याहून
पृथ्वीच्या पाठीहून
विशाल
त्याचे अल्सेशियन प्रवेशद्वार
जे उघडू पाहत असता
दिली लाऊन आग
या गुलाबाने
( पाकळी पाकळी
हरता हरता )
एका प्रश्नाच्या
कमरेभोवती गुंडाळलेल्या
सत्याग्रहाला

आणि चटक्यासरशी
तो प्रश्न
—एक राक्षस
अचानक कोलमडला
नेसूचा जळता सत्याग्रह
फेडून टाकून
आणि फेडून टाकून
पाकळ्यांचे दाहक गळणे
विवस्त्र पळाला
एका दिशेची चिंधीही
अंगावर नाही असा
बोंबलत.
कारण गुलाब
त्याची शरीररचना
व सत्याग्रह होता

खडकामधला सार्वभौम घनतेचा
अनावर अश्व खिंकाळतो
जसा शून्याचा स्वार
हाणतो लोखंडी टाच,
अद्वातद्वा धावतो
खडकाच्या धमन्यातून
पण फेसाळून काबूत येतो

या खडकाचे
मी बघतो आकाश
अंग चोरताना
जसा या छिन्नीला
पहिला कोंभ फुटतो
रितेपणाचा

बघतो या खडकाचा अंधार
हनुवटी चोळत पळून जाताना
भोवंडून बेभान झालेला
छिन्नीची बाही वरती सरकून
जसे उघडे होते
रितेपणाच्या वसंताचे दणकट मनगट
आणि पहिला कराल गुद्दा
दीप्तिमान होतो
अढळपद मिळवून

आघातांचे तेल पिऊन
चेतलेला पलिता
छिन्नीचा घेऊन
मी पहातो
या निर्वाणीच्या गुहेचा
खरा आकार
आणि खग्रासपणा

पहातो गुहा ही
उफाड्याची होताना
धमन्यातील रात्रीमध्ये
( त्या खडकाच्या )
चांद‌्णी ठसठसताना

जेव्हा माझ्या बैरागीपणाचा जमाव
तुझ्या राजधानीमधे उठाव करतो
आणि माझ्या जाण्याचे ढोल बडवीत
दवंडीवाले ' कत्तलीची रात्र ' म्हणून ओरडतात
तेव्हा तुझी खपलीची पापणी उघडते
तुझ्या जखमेच्या डोळ्याला दिसू लागते
एका इरसाल सत्याचे झणझणीत पाणी
तुझ्या जखमेभोवती गिरकी घेते
तुझी डोळस झालेली जखम
एका भोवऱ्यामधे सापडून दिपून जाते
आणि तुझ्या शोकाच्या
हुंदके देणाऱ्या कळसाला
आभाळ आपल्या मिठीमधे घेते
तुझ्या राजधानीमधे
धमालीच्या गटारात पडलेला
प्रेमाच्या डोक्यावरील मुकुट
नेपोलियनप्रमाणे तलवारीच्या टोकावर उचलून घेतो
तुझा शोक

माझ्या डोळ्यांच्या फसऱ्या झुडुपातून
नरमांसभक्षक
अश्रूंनी उड्या घेतल्या
आणि तुझ्याभोवती गराडा घातला
रे माझ्या प्रभामय स्मितांच्या सोनेरी जंगलात
आणि डोंगरदऱ्यात
वाट चुकलेल्या धाडसी प्रवाशा

आता तुला माहित आहे
की मी तुझा मोर होतो
आणि तुझी हत्याही मीच होतो
न पहाणाऱ्या डोळ्यांची
निळी शिडे उभारून माझ्या आलिंगनाची होडी
अभिलाषेच्या सागरात जी लोटली होती
ती तुला मरणाकडे नेण्यासाठी

हे आता तुला माहीत आहे

एक पक्षी गोंदतो माझ्या पाठीवर गीते
माझ्या हृदयाने गंगार्पण केलेली.
तिच्या डोळयांची
मुखदुर्बळ झाडे मी कितीकदा चाळली आहेत.
पक्ष्याच्या एकटाकी निवडुंगात मी वारंवार
उताणा पडलेलो आहे.

पण तिच्या डोळयात
त्या पक्ष्याचा उल्लेख मला आढळलेला नाही.
बोचरी गाणी माझ्या पाठीवर थाटलेली आहेत.

या तावदानात प्रतिबिंब झालेली ही खोली
इथे बसलेली तू आणि मी
इथले फर्निचर
आणि ही एक दगडी भिंत
हे सारे तिथे
तावदानाच्या देशातील रीतिरिवाजाप्रमाणे वागते.
तावदानाच्या घटनेला मोकळ्या मनाने मानते.
इथले सारे
तिथेही रहिवासी आहे.
तिथे आपल्यामधून पलिकडचे दिसते.

खरीखुरी जाईची जुईची फुले
तावदानात दिसणाऱ्या खोलीच्या लेखी
कागदाचीच.
तिथे त्यांना सुगंध नाही.

तुझा हात मी पहिल्याने हातात घेतला
तेव्हा तुला शिरशिरी आली
ती इथे.
तिथे शिरशिरी नाहीच आली.
आणि मी कितीही मोठ्याने ओरडलो
तरी तिथे आवाज होणारच नाही.

तू कोण आहेस?
ती म्हणाली

ज्या शय्यागृहात ती उतरवून ठेवी
झोपण्यापूर्वी तिची नग्नताही
तेथूनच एकदा तिला
मी पळवून आणले
माझ्या मिठीतच तिला जाग आली
पण मला तिने ओळखले नाही
तिचा प्रश्न मला समजला
पण ती भाषा नवखी होती

मी तिला खोटे नाव सांगितले
आणि पुनः नव्याने ओळख झाली

जेव्हा तुझ्या मनाचे बांध फोडून
कोंडलेल्या वाटा फेसाळत खडकाना कवटाळत
निसरड्या निसरड्या जातात
तेव्हा तू ढासळलेली
बांधावर असतेस उदास
भरवीत त्या जळधुमाळीस
स्वतःच्या
ओढाळ मांसाचे घास

मी असतो खडक आणि खरचटत
तुझ्या धुवाधार स्वातंत्र्याचे पचवीत हलाहल ताठ
तुझ्या मोकळ्या झालेल्या शिंगाड्या वाटांच्या
हुंदडणाऱ्या
टकरिश टॉवेलाने पुशीत
सुखाने थबथबलेले माझे अंग माझी पाठ

अतृप्त दृष्टीच्या नळीतून माझा प्राण
देशांतर करतो
व तुझ्या चेहेऱ्याच्या कपातील
साबणाच्या पाण्यावर जन्म घेते
कलमी बुडबुड्यांची पिढीच्या पिढी
आणि होते सुरू
तुझ्या चेहेऱ्याच्या बाजारपेठेत
लाखो आकाशांची उलाढाल

पुलावरून मी पहातो
तुझ्या प्राणाच्या पुराचे पाणी
आणि नक्षत्रांचे वृक्ष
त्याच्या भोवऱ्यात सापडलेले
आणि भ्रम होतो
की तुझ्या चेहेऱ्याचा पूल
खराच चळतो

वाऱ्याच्या बोटांनी
तुझ्या चेहेऱ्याच्या तळ्याची पाने
भरभरा उलगडून पाहतो
शतशतकांच्या
आकाशांची कात्रणे
आणि ज्या पानावर असतो
प्रेमाचा पहिला जाहिरनामा
तिथे स्थिरावतो
पुनः पुनः वाचतो

# दैवत

हिरवी पोपटपंची
चतुराईची चंची

या चंचीने कशाचे करावे गोपन ?
वांझ वचनांचे.
खोट्या मोत्यांची एक माळ.
काही हुरहुरणारी पिसे.
सोनचाफ्याच्या काळवंडलेल्या
काही पाकळ्या.
पांगळ्या
पोपटाच्या भजनी लागून
कितपत निभणार ?
त्याची रडी चोच चिकटलेली आहे
त्याच्या गालाला
चिपडानी धरलेल्या पापणीसारखी.
डालडाच्या डब्यात
उगवेलच तुळस किंवा सदाभार
योग्य वेळी.
पण तोवर करील का रक्षण
कागदी पंखांचा कापडी पोपट ?

आकाशि बंगला
खालि पाय रंगला

जर तू दिलेल्या अंगठीतला
खरा मोतीही जाणार
तर अधेलीची कस्तुरी
बोलूनचालून खोटी म्हणूनच घेतलेली.
तिचा तर जाणारच जाणार सुगंध.
काचेच्या पेल्यात पोहणारा मासा
हौसेचा झाला तरी
पेटत्या काडीच्या धगीने
तडफडणारच.
तडफडून मरणारच.
देव्हाऱ्यात
या पोपटाला बसवून काय होणार?

दोन भिंती समोरासमोर
सदा राहतात परस्परांच्या धाकात
नजरबंद

एका भिंतीवर टांगलेल्या आरशात
दुसरीची स्थिरचित्रं

सरळसरळ ब्लॅकमेल करून
एक उकळते दुसरीची नेकी

दुसऱ्या भिंतीचा दिपलेला पंजा
धजत नाही फोडायला
मायावी तिजोरी

शंभर कँडलपॉवरची तंग कच्ची फळे चार पाच
त्यांच्या प्रखर उकत्या मिठीत
जे जे आहे ते ते

लाकडी खच्ची केलेले पाशवी टेबल
त्याला जबडा नाही आयाळ आहे
त्याच्या कुंजाखाली एक जोडपे वळवळणारे
पालीच्या तुटलेल्या शेपटीसारखे, तेवढेच लहान
सुंता केलेले कुंजाचे पंजे हसणारे
सांगाड्यासारखे निरोष्ठ
दाखवून नखे आणि पुराण्या रक्ताचे पाणचट डाग

हिरव्या कच्च्या प्रकाशाची संग खच्ची फळे चार पाच
त्यांच्या प्रखर उकत्या मिठीत
जे जे आहे ते ते

दोन केसाळ हृदये भादरलेली
सातूच्या लिंगाच्या बिबट्या संगीताने
उधळून गुलाल डागला कानाचा व्यूह ज्यांच्या सर्वांगावरती
त्यांची शेज चालू लागली उठून तिरडीच्या पायानी थेट

आम्ही दोघानी हे पाहिले
पुंजक्यापुंजक्यानी खाली विखरून

टचकन उमलते बेवारशी तृप्ती
पाण्यात झुगारलेल्या सिगारेटसारखी.
पिकतात खपतात जन्मांध वांगी
तृष्णाकाठी. स्पर्शजन्य कमळे
एकामागून एक तोडत निळीफोल घोडी जाते.
नसानसात चिवचिवणारी व्हीनस नासून जाते.

तृप्तीने बाळगलेला विफल तंबाखू
उघडकीस येतो. आणि कोणताही वारा
वेचत नाही ते वांझोटे पुंकेसर.
निर्वंश भाकणाऱ्या शंभर पाकळ्यांची
कमळे उगवतात मरणप्राय पाण्यावर
असाध्य रावणाच्या मुंडक्यागत दुर्दम्य.

मूलभूत पिंजऱ्यात नर आणि नारी
पाशवी प्रकाशात चाचपडतात ठेचाळत.
पिंजऱ्यात टाकतात एकादी भाकरी
बघी श्वापदे. उच्चभ्रू उंट
उंच टाचांची मृगी वा चष्मिष्ट चित्ता.

अमली प्रकाशात दिपलेल्या दोघांची
स्मृतिभ्रंश झालेली त्वचाहे बोथट अन
गुळगुळीत कोवळ्या निवडुंग-पंजागत.
केविलवाणे काटे पुकारून दोघेही जगतील
या प्रकाशास बोचकारत, निवडुंग-निःसंज्ञ.

त्रासिक बिछान्यावर कामचकित दोघे
रात्रीची लंगडी त्रिज्या आहेत.
त्यांना लागतात रात्रीच्या वन्य
चतकोरात गाजणाऱ्या ढोलांचे सचित्र वेध.

रात्रीच्या वन्य चतकोरात चित्ते व चित्तिणी
चांदणे पितात. व त्यांच्याच अज्ञानाच्या
मूर्तींपुढे लोळण घेऊन ढसाढसा रडतात.
प्रसाद म्हणून वाटतात दगडाचे रक्त.

लाचार झोपेच्या तारवटलेल्या काळ्याढेर तळाशी
चलाख अनिरुद्ध जलमय बोटे कुजबुजतात रंध्रांशी
भडभडा बुडबुडे धडधडत चढतात झोपेच्या फिरकपायऱ्या
व अफाट डुचमळत्या गच्चीवर फैलावतात खुनशी तेल
झोपेच्या क्षितिजहीन डोळ्यावर रंगीत झापड तवंगते

अरुंद खिडकीतून ओसरती उडी घेतो झोपेचा समुद्र
थोड्याशा बोटांवर निभावून ती बोटे राहतात तडफडत
तेलकट आततायी रंगभ्रांतीत तळाशी तसा
भानावर येऊन मी वेचतो माझी विखुरलेली रंध्रे
आणि बोटांना उकलून परत मिळवतो त्यांनी गिळलेलीही थोडी

आडगावच्या हॉटेलातील
मरणाशेजारची खोली
माझी मांडतील कुंडली
तिथल्या भिंतीवरल्या पाली

आडगावच्या हॉटेलातील
कुढी तामसी खोली
हस्तमैथुन पाहील तिथल्या
कुत्सित कोपऱ्यातला कोळी

तिथे मीच माझी बघतोय वाट
एका खोलीत मांडून ठाण
दार उघडेल आपोआप
माझी चकारताच वहाण

आडगावच्या हॉटेलात
एका ओक्याभुक्या खोलीत
मी लावणार आहे
माझ्या माकडाला कोलीत

नारळी काळोखात आंधळा संकोचून
अलिप्सतो आतल्याआत मीठा गोटा.
काळोख खिंकाळतो फेसाळत पिऊन
डोळस पायाचा मसालेदार घोटा.
याच नारळाने भारावतो दिवसाचा ओटा.

काळोखाच्या खोबणीत घोळणारा अंधा
वेळावतो मोकळिकीचा थोड्यागत लांडा दंड.
आपल्याच उणीवेचा व स्वातंत्र्याचा सांधा.
काळोख ढेप होतो खुळाची प्रचंड
तोबरा दिल्याने या गुळखोबऱ्याचा अखंड.

विजयाच्या टपावर धुराड्यासारखा राजा ताठ.
विटक्या टापपडसादांच्या पताका सभोवती
निश्चल. मनात धुमसते कोरी विराट पावती.
हानीच्या पानापानावरून घाट्याघाट्यावरून दाट
यशाची उतरते आंबील व होते गोळा
त्याच्या वाळलेल्या जिभांच्या लुळ्या द्रोणात
अन द्रोण वटारतो टेबलावर ठेवलेला डोळा.
त्या नजरेने राजा फुटतो चिलखतातल्या चिलखतात.
आंबील–आदरार्थ पुढे सरसावतो चिलखताचा हात.

गालिच्यात गढवलेले सतरा
सिंह मोकळे होतात
फासाला लोंबणाऱ्या स्त्रीच्या
सुन्या शरीरात

कोपऱ्यातला काचेचा बकरा
घेतो अभौतिक उडी
फासाला लोंबणाऱ्या स्त्रीच्या
ओलांडतो तडी

रिकामी फुल्दाणी चमकते कॅमेरा
फ्लॅशचा चमकावा तशी
व फोटो घेतलेल्या आत्महत्येच्या
दिव्य निगेटिव्ज अशी

फुले प्रसवते दृष्टिहर उज्वल
जी जाळतात बघ्याचे दृष्टिपटल

कामीजनांना चुचकारतात ढेकूण. उकाडा
त्यांच्यामधे माजवतो बखेडा.
घडपडत हात शोधतो दिव्याचे बटण
व इलेक्ट्रिक वस्त्रहरण
काळोख्या कळसत्या शारीरिक घटकेचे दुस्तर
होता होते नग्नता त्यांची निरुत्तर.
अप्रासंगिक औरसचौरस प्रकाशप्रश्न
खिडकीबाहेरही कलता ठेवतो पठाण.

प्राथमिक ढेकणाना चिरडतात कामीजन.
परंतु त्यांच्या मानसिक शिवणीत प्रकाशाने घातलेल्या अंड्यांतून
मुद्देसूद बाहेर पडतात कुशाग्र प्रखर नवढेकूण
जे मालवता मालवत माहीत.
नि उकाडाही राहतो अबाधित,

# बेडुकवेळ

पाणथळ वेळी टरटरतात बेडूक.
घोंघावतात चांदण्या.
एका वावटळी रातकिड्याचा कण
डोळ्यात जाऊन भणाणतो.
एका बेडकाची करवत कापते
लाकडी वेळेचा टरटरीत पाय.

एक बेडूक धार लावतो
गंजलेल्या वेळी.
एका रातकिड्याची आक्रस्ताळी चांदणी
किर्र करकचून चमचमू लागते.

रातकिड्याची सायकल रुतून बसते
भुसभुशीत वेळेच्या मानेत.
बेडकांच्या सप्तकात माती गाते.

माझ्या गायब हातांचे बेडूक छेडतात
वेडपट वेळेचा ध्वनिक्षेपक फुगा.

कोसळलेल्या वेळेच्या मृण्मय बोटातली अंगठी
बेडकाचा पुखराज डोळा घालते
प्रकाशाच्या स्रोताला.

# इराणी

इराणचा चकणा शहा पाहतो तडकलेल्या व सस्मित
काचेआड केकला चढणारी क्रमिक बुरशी.
क्वचित विचलित करते त्याचे लक्ष सुशिक्षित
बेकाराला राखी बांधताना अकृत्रिम माशी.

चित्रातील वनराजीच्या कुशाग्र निर्जीवतेस व्यग्र
करीत नाही वारा; अन सरळ सरोवराचे विपर्यास
वाकडा हंस. सुईसारखा सीधा मार्ग
अग्रावर तोलतो राखीव बंगल्याचा रेखीव आभास.

अशा निसर्गचित्रांची होते ग्लासात अविद्राव्य तारांबळ
घोटागणिक परिच्छेद पाण्याचा लांबताना तृषार्तासमक्ष.
जिज्ञासूंचे वेधू इच्छिते चहाचे विचक्षण वर्तुळ
विचारप्रवर्तक टेबलाच्या महत्त्वाच्या भागाकडे लक्ष.

खुर्चीखालील अंधारांना निमित्त झालेले मांजर,
गतप्रभ दुश्चिन्ह, सांभाळते दुटप्पी झोपेत दोन
सापत्न स्वप्नप्रपंच. दिशांची अफरातफर
करून बिलोरी मंत्रिमंडळ पिकवते अप्रच्छन्न प्रतिबिंब.

सिगारेट पेटवून बेकार ठेवतो जळणारी काडी
चहाच्या वर्तुळात जी उठून बसते विझताना जरा.
अगत्यशील जशी लाश बर्फाच्या लादीवर उघडी
समशीतोष्ण कोणी आलासे वाटताच सगा सोयरा.

# एकटी

तुझ्यासारखी बेढब बाई
कुणी क्वचितच पाहिली असेल
पण तुला
एक कविता मी देऊ लागतो

पण तुझ्याबद्दल लिहिणार तरी काय ?
फार तर मी असं म्हणू शकेन
की मुक्या प्राण्यांवर
तू दया करतेस

तुला मी पाहिलं
ते एकदाच
मैदानावर
एका घोड्याला तू गाजरं खाऊ घालत होतीस

तुझ्या उभेपणात
कसलीच शोभा नव्हती
पाणी तापवायच्या बंबासारखी
तू केवळ उभी होतीस
एक हात पुढं
आणि त्यातली गाजरं खायला
एक लाळघोट्या घोडा
खाली मान करून तुझ्यासमोर उभा होता

त्याच्या लाळेचा
एक शिंतोडा
तुझ्या करंगळीवर पडला
व अंगठीसारखा चमकला

मग वारा पडला
अन तुझ्या सारख्या झालेल्या झग्याला
सहज मिळून गेले
सरळ झालेल्या गवताचे तुरे

यमदूत खोवतो एक निष्कर्ष दुर्मीळ पण विद्रूप
फुलपाखराप्रमाणे थेरडीच्या मेंदूत. ऐकवतो
एक अश्लील चुटका. थेरडी हसते. खोटे पण खूप.

कुणाच्याही लक्षात तिचे बहिरेपण येत नाही सहसा.
खिडकीला पडदा. फुलाफुलांचा. मळका.
त्याआडून थेरडी खाते रात्री आणि दिवसा

बाक्या नखनशा बोटांनी सोडवलेली ढिली
संत्री आत्मसंरक्षणार्थ. दुबळ्या फोडी
भंगतात विरक्त. तुटत जाते नाजुक जाळी.

फुलांच्या गणिताआड दाढा दळतात कोरड्या फोडी
पोत्यात पकडलेल्या घुशीच्या उत्साहाने घुसळतो चेहरा.
नजर शांत : प्रक्षुब्ध रणांगणावर मेलेली घोडी.

## दिवे

काहीतरी कुजल्याचा वास याय लागला
अन मी खिशातनं रुमाल काढणार
तोच माझी करंगळी खाली पडली
ती मी दुसऱ्या हातानं उचलून घेतली
अन रुमाल नाकावर धरणार
तर नाकच निसटून रुमालात आलं
ते रुमालात गुंडाळून मी खिशात टाकलं

काहीतरी कुजल्याचा वास येतच होता
म्हणून खिशातल्या खिशात नाक मुरडलं
अन करंगळीत आळ्या पडल्यात की काय
ते बघणार : पण तेवढ्यात दिवेच गेले

# पर्शियंन मिनिचर

पर्शियन मिनिचर्सच्या धर्तीवर
माझं एक असं चित्र काढ :
दोन बेशुद्ध सिंहांच्या जाडधूड ढिगावर
बसलोय मी, हातात एक बाड

कातडी बांधणीचं. असू देत
इष्कभोर व तृप्त माझे डोळे.
सत्त्वाढ्य, वक्षघोळ, गाढी दाढी
जणू कृष्णमधाचे त्यक्तडंख पोवळे.

समजूतदार कुंचल्याने माथ्यावर सूर्य फुलव.
धुळीची व उन्हाचीच रंगयोजना
चित्रभर असू दे. कुठेही लव-
मात्र नसू दे वाऱ्याची सूचना.

माझ्या पर्शियन पोषाकावर
काढशीलच काढशील नक्षी.
एकदोन झाडंही असू देत बाजूला,
नसला तर नसू दे पक्षी.

तुझ्या खोलीत ते चित्र असू दे
टांगतं. अन तिथूनच मला
रात्रंदिवस पहायला मिळू दे
तुझ्या दिवसांचा उदास हिंदोला.

रोज तो बसनं जाता येता बघायचा उभ्या निवडुंगाची झाडं
अन त्यांच्या दोन बहरातल्या कालांतराचं त्याला कुतूहल वाटे.
फुलं यायची तेव्हा खचून, शुभ्र व एकेक चांगलं कमळाएवढं.
एरवी आपले काटे.

बसनं जायचा कामाला. काम ! काम ! कधीमधी इतका तो विटे,
इतका की उतरावं इथंच व इथंच व्हावं उन्हातान्हात दृढमूल व काटेरी
असं त्याला होई. एका बहुश्रुत मित्रानं त्याला सांगितलं की पहाटे-
पूर्वीच्या काळोखात केव्हातरी

एक विशिष्ट भुंगा त्या झाडांना पॉलिनेट करतो. ही माहिती खरी
की खोटी, हे त्याला बघायचं होतं, सगळी माहिती हवी होती, इतपत बेहोष
तो सद्गृहस्थ झालावता. पण मग त्यानं ती सुटून दुसरी धरली नोकरी
अन विसरलाही उघडायचा ज्ञानकोष.

उभ्या निवडुंग मग किती दिवसानी फुलतो हे माहित नसलं त्याला तरी दोष
द्यायचा नाही मी तरी.

# श्रीज्ञानेश्वरसमाधिवर्णन

स्वच्छ निळसर रिकामे अंबर
नारद तुंबर अभ्र विरे
कधी केले होते गंधर्वांनी खळे
स्वताशीच खेळे चंद्रबिंब
पांगले अवघ्या वैष्णवांचे भार
ओसरला ज्वर मृदंगाचा
मंदावली वीणा विसावले टाळ
परतून गोपाळ घरी गेले
स्थिरावला हार वाळली पाकळी
गुंतली फासळी निर्माल्यात

# मेणबत्ती

मेणाच्या थारोळ्यात लढवून ज्योत
आता वात सुखाने मरते. त्रिकालदर्शी
रात्रीला वाहिलेली मेणबत्ती कोमेजते
झिजेच्या झळीने. श्वासोच्छ्वासाचा
ईश्वरदत्त फासच गळ्याभोवती कचतो.

मायेच्या गुप्तीमधे देवांची तलवार
अनोळखी रहाते. उलटून ठेवताच
रोजच्याच चित्राला वाचा फुटते.
आणि परवलीचा शब्द मिळतो
देवांच्या अड्ड्यात मिसळण्यासाठी.

ग्रा. क्र. २१५९४ ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

देव मेणबत्त्या जाळतात रात्रंदिवस.
त्यांच्या दिवसहीन साम्राज्यातील सारे
व्यवहार होतात मिणमिणत्या चरित्रांच्या
निर्बल प्रकाशात. नेमलेल्या जागी
चरित्रे असतात अविश्रांत उभी.

वितळलेल्या मेणाचा पहिला ठिपका
कढत सही करतो देहांतस्थानी
कोऱ्या प्रतिज्ञापत्रकावर. पत्करतो
जन्मठेप मेणबत्तीच्या वतीने. काळोख
मरणाच्या ओंजळीने चरित्रे पितो.

समकालांच्या समांतर रेषा जेथे
नाकासमोर मिळतात तेथे बीज
रुजते देवांच्या जगड्व्याळ भूमितीच्या
प्रतिगामी वृक्षाचे. प्रळयाचे मृगजळ
देवांच्या भूमितीच्या फांद्या पोसते.

मेणबत्तीपेक्षा वातच लांब
असावी लागते. उमेद्‌वार वात
जन्माच्या टाळूतून गर्भाशयात
निवडणुकीसाठी उभी असते.
भांडवलदार ज्योत मुळासकट

मेणबत्तीला खाऊन टाकते.
मेणाच्या थारोळ्यात ज्योतीशी लढून
आता वात सुखाने मरते.
उताणे पडलेले लबाड कासव
सुलटे करताच सुरू होते.

# मेणबत्ती

माथी प्रकाशाचे कर्ज घेऊन जन्मते मेणबत्ती.
स्पष्ट तिच्या प्राक्तनाची ओवी—सीधी, सुती;
जशी मस्तानीच्या गळ्यातील रसरेषा उतरती.

मूलग्राही ज्योतीसाठी आखलेले मुदतीचे रोप
—ही ज्ञानियाची घटिका—देते सादर निरोप
एकेका वितळत्या पळास. पाचोळतो आरोप

दिक्कालांचा.
                    पण आणखी एक मेणबत्तीची जात
मी ओळखतो. ज्योतीने नुसता हात
लावताच जी आखडते गोगल-शिंगागत वात.

पुनः पुनः जवळतो व दुरावतो सर्कशी झूला
ज्योतीचा व माझा. मी घोटतोय मेणाचाच पल्ला.
पण निःशंक झेप धजत नाही ज्योतीची घ्यायला.

# मेणबत्ती

एकच वाट तुला मोकळी होती
तीच सुधारत गेली
उभ्यानेच तुझी यात्रा झाली

स्वतःला वाट देताना
तुझी झालीस तूच
वाटखर्च

मिळवलेस दागदागिने
अवयवांच्या मोलाने
आता अंगावेगळी हो
उजळ माथ्याने

डोंगरदऱ्यांच्या माझ्या बापाने बांधली
झळांच्या झावळ्यांची खुलास मरण-
कुटी, जिच्यावर मृगजळाचे तोरण.

अवकाशाचे सांधे तेव्हा ठिकठिकाणी करकरत होते
जेव्हा मळवट भरलेली दुपार आली वाघावर बसून
आणि तू झालीस तिची सून.

खडकावर फुटलेल्या निःसंकोच लाटेतून कबुतरे उडाली.
कडुनिंबाच्या ओच्यात पेटला साळुंक्यांचा सर.
आणि सुरू झाले हिऱ्याकोळशांचे ज्वालाग्राही संवत्सर.

मै मॅनेजरको बोला मुझे पगार मंगता है
मॅनेजर बोला कंपनीके रूलसे पगार एक तारीखको मिलेगा
उसकी घडी टेबलपे पडी थी
मैने घडी उठाके लिया
और मॅनेजरको पुलीस चौकीका रास्ता दिखाया
बोला अगर कंप्लेंट करना है तो करलो
मेरे रूलसे पगार आजही होगा

मै भाभीको बोला
क्या भाईसाबके ड्यूटीपे मै आ जाऊ?
भडक गयी साली
रहमान बोला गोली चलाउंगा
मै बोला एक रंडीके वास्ते?
चलाव गोली गांडू

मै बर्मा गया उधर आग पिक्चर लगा था
पिक्चर देखने गया
उधर टिकटके वास्ते कुछ पासपोर्ट वगारा दिखाना पडता है
टिकटवालेने पूछा पासपोर्ट किधर है ?
मै बोला भॅनचोद
मुझे टिकट मंगता है

उन लोगोने वापस मणिपूर भेज दिया
पुलीस कमिशनरने पूछा बर्मा कायको गया था ?
मै बोला अबे लौंडीके बच्चे
इंडियामे रख्खाही क्या है !

## न्यू येर डे

अपनाही मुलुखका आदमी.
खाली तीन महिना हो गया. तीन.
उसका शादी होनेसे.

टॅक्सी ड्रायवर था. न्यू येर डे.
उसका क्या हो गया ? औरत था.
पीनेवाला आदमी.

वो तो सोयेला था. खाली
चार दिन हो गया. पाच. छे समझो.
औरतने क्या किया ?

उसके उपर पेट्रोल डाला.
और काडी लगाया. सचही.
और बादमे खुदको.

वो तो मर गयी. हां. बेचारी.
वो तो जिंदा है. हॉस्पिटलमे.
पहेचानवाला था.

देख भी नही सकता. नही. बिलकुल.
औरत? औरत तो मर गयी.
चरबी होता है ना!

समझो साब न्यू येरभी क्या है.
सांताक्रूजमे. मुलुखवालाच.
येभी गाववाला.

उधर औरत दो बच्चाभी है.
लायसन रिन्यू करनेको आया.
बावडी होता है ना?

उसके रहाटके उपर बैठ गया?
बिलकुल. और गिर गया.
पीयेला. अंदर

# गच्ची

नितळ भिंतीवरूनही गोठवलेला बेरड जसा उभ्या उभ्या
उतू जातो, त्याच्या पाठीला समजतात सर्व भिंतींच्या कळा
तसा पटकन ग्रहण करतो आकाशाच्या खाचाखोचा, खुब्या

व पाचपेच तरतरीत पतंग; मग आकाशासही त्याचा लागतो ळळा.
तिथेतिथे जाईन, जिथेजिथे जाऊ शकतात फांद्या,
म्हणतो माकडचवड्या बेलाशक कारटा. आणि रसातळास

नेईलशा कुटिलतम फांदीचेही अंत पाहतो; अस्मानी फांद्यां-
चीच फाटाफूट व डहाळ्या. पण पतंगपसंतीचे सविस्तर
केस वारा पिऊन डोळे झापडू लागतात. तेव्हा सध्या

ते डोळ्याआड तरी केले पाहिजेत. निर्भर प्रकाशवेफर,
उनाड कवडसा, पृथ्वीचुकार, कटलेला किरण,
झुलणारा, स्वैरोन्नत; त्याचा आता पडायला हवा विसर.

आज आपला विषय आहे—एक गच्ची. प्रत्येक चढण
गुंडाळून घेतलेला पतंगपायथा; एक बुंधा, विस्तार-
भयाने शिरच्छेदलेला; एक छाताड, हातपायविहीन.

दारातला केर काढणारी शेजारीण, लयबद्ध चढउतार
तिच्या ठाशीव तुल्यबल कुल्यांचे; उकिरड्याशेजारचा
आळसट कुत्रा; रंध्याची घासाघीस करणारा सुतार;

गोट्या खेळणारी पोरे. हा विविध साचा
गच्चीवरून दिसणाऱ्या व्यापारांचा फुटू दे. प्रकाशित
होतील गच्चीच्या रूपरेषा मगच. श्रुतीचा

गज ओढला जाऊन गुह्य तंतूंच्या शय्येवर, अवयवांकित
होईल संगीतशरीराच्या, जेव्हा ते चुनेगच्ची, स्वयंस्फूर्त
वाद्य, ढळून कर्मप्रधान गवसणी, होईल अनावृत्त.

एकादे फुलपाखरू त्या गच्चीवर गोता खाते, होते भ्रान्त;
पण एकाद्या अधिक प्रचलित व सर्वमान्य फुलाच्या जरा
अधिक सोप्या पाकळ्यावर परत तोल कमावते; सज्ञान सुरवंट.

निदान एक सकाळ, एक दुपार, एक संध्याकाळ अन पंधरा
न संपणाऱ्या वेगवेगळाल्या रात्री
मला त्या गच्चीवर काढायला हव्यात; गारा

कशा तडकतात, पाऊस भिजवतो—ही सारी
तिची रूपे जेव्हा जमतील चांदणीभोजनास,
तेव्हाच पूर्णिमा पाहील माझ्या रक्ताची पाठकोरी

बाजू. मग जाऊ दे खुशाल त्याना उतरून जिना.
माझ्यावर कविता लिहायचं गच्चीच्या मनात तरी येईल?
माझ्याही मनात तिच्याविषयी तसलं मग यायचं नाही पुन:

आमच्या बांधणीच्या प्रत्येक दगडाची झाली असेल अदलाबदल.

## घाणा

दोन मांड्या पीळ देतात परस्पराना
तळव्यापासून ताळवेपर्यंत दोन अंगानी फिरतो मी आतात
दोन कानशिलं वळसे घेऊन जातात भिवयांच्यामधून

दुबारा दुबारा दुबारा फिरतो माझा जरासंध घाणा
छाताडात घुसलेला ऊस कडकडतो अनाद्यनंत चिपाड
उजवी डावीकडं उजवीकडं डावी
धाव घेते फिरून फिरून कूस

अभ्यंग चिघळतो गुळमट चुकून चघळतो माशी

## चक्की

अंगात फिरतात चाकं
श्वासांचे फिरतात पट्टे
सांभाळा आपापले फेटे
गाववाल्यानो

बाई ग तू कोणीही अस
भटीण घाटीण किरिस्ताव
इथं नाही भेदभाव
पदर खोच

अन मुकाट्यानं घर गाठ
तू म्हातारी की तरणी
ते पण ही गिरणी
विचारणार नाही

तू दगडू धोंडू की पांडू
स्त्री पुरुष की हिजडा
काळा गोरा जाड लुकडा
कसा का असेनास

पण बापड्या मेरबानी कर
आता विसर तुझी जवार
अन जिवात जीव आहे तवर
धुम पळत सूट

प्रोप्रायटरसाहेब
जरा मागं हटा
नाहीतर आटापिटा
होतील हाडं

ही चक्की आता मॅड झाली
जो हात घालेल भीक
तोच खाऊन शमेल भूक
आता हिची

भकभक भकभक भकभक
हिनं पिसली जगदंबा
तिखट गोड की आंबट
न विचारता

# अन्न

माणूस मुर्गी एकच
विधिनिषेध नाहीच
दगड धोंडे माती
जे असतं ते अन्नच

आवड निवड म्हणून
कधी ठाऊकच नव्हती
एकेक दिवस आला
तोच परातीसारखा

जे वाटेस फिरकलं
त्याचा फडशा पडला
चाऊन चाऊन थुंकून दिले
कित्येक दंतवैद्य

अंगातल्या अंगातच
शर्ट गडप झाला
अन घड्याळाचा घास
मनगटानं घेतला

प्रथम जे कुरतडलं
ते आपलंच आतडं
ओठ आणि जीभ पचवून
मग मोकळ्यानं हसलो

ही आग    ही हसरी    ही दुसरी
हिचं काय करू    हिला कुठं ठेऊ
ही लाऊ का    घराला    दाराला    जगाला
ही काय रांधेल    कुठं पसरेल
ही चूड    कुठं फेकू
ही आग    शिरोधार्य
ही आग    हो मशाल
हिला    डोक्यावर    घेऊन नाच

चल आपण खेळू
पेटव माझी सिगरेट
पळव माझं इंजिन
फुलव माझी भाकरी
शिजव माझी डाळ
आटव माझे प्राण
उकळ माझं रक्त
वाकव माझं पोलाद
वितळ माझं सोनं
भाज माझी वीट
नाचव माझी मोहरी
जाळ माझं मढं
सोड माझे बाण
दाणादाण

ही आग    ही हसरी    ही दुसरी
मी कोसळता रावण    मी कोळसा    मी कोळसा
हा दसरा

ही आग    आगाग    ही होळी
धावणारं कुंपण    मी पळणारा वासा    ही होळी    ही होळी    ही होळी
मोडलेली खिडकी    मी तोडलेलं दार    ही होळी    ही होळी    ही होळी
लंगडणारी खुर्ची    मी खुरडणारं टेबल    ही होळी    ही होळी    ही होळी
उडणारं कपाट    मी लुटणारी वखार    ही होळी    ही होळी    ही होळी

बिनभुयार हे जग    हे लाक्षागृह
निरुपाय निरुपाय    आगीचे बंब    वाळूच्या बादल्या    पाण्याच्या टाक्या

तू आग    मी खाक
तू आज    मी रोख
तू काल    तू आग    तू उद्या
तू आग    तू आत्ता    तू मघा    तू मग
तू गुल    मी छडी
तू गंधक    मी काडी
तू धुनी    मी मुनी
तू आग    तू माग    तू घे
मी धूर    मी धूर    मी धूर

यज्ञ मीच   यजमान मीच   वेदी मीच   पुरोहित मीच   स्थंडिल मीच   आहुती मीच
ही आगच   अडाणी
समरपयामि   समरपयामि   समरपयामि

पेटेल आयाळ   आवरतं घे
भाजेल शेपूट   संभाळून ने
चल रे माझ्या सिंहा   जरा नमतं घे
या जळत्या वर्तुळातून   उडी मारून जा   आरपार
इकडून तिकडे   नि पुनः   तिकडून इकडे
ही शून्याकार आग   ही जळती मोकळीक   रोजचीच आहे
ही सर्वस्वी सर्कस   तुझीच आहे

राजाभाई टॉवर   गेटवे   ताज
मॅजेस्टिक हॉटेल
या इमारती   श्वापदं   कोल्हे   वाघ   रानडुकरं
हे जंगल   घडीव   हा स्पष्ट   अंधार
ही गिधाडं

तू शेकोटी   शेजारी   आग
पांगव   हे शहर   ताटकळव

राजाभाई टॉवर   गेटवे   ताज
मॅजेस्टिक हॉटेल   चर्चगेट स्टेशन
टाउन हॉल   व्ही टी   रीगल   इरॉस
तटस्थ   स्तब्ध

जळत रहा   please   माझ्यासाठी
ऊब   राख   मला

हे शहर   घाबरव
नाहीतर या   बिल्डिंगा   मला   फाडून   खातील
हे शहर   जैसे थे   तू म्हणून   नाहीतर   नाहीतर

दहशत हो   शहराला   म्यूझियमला
शेजारी   अस

चिखल ठरलो भिक्षापात्र भटकलो भाग्यहीन
वाक्यहीन वाळवंटी अनवाणी आकाशवाणी
पिऊन आरशांची निवळी झालो गोसावी सावकाश
सूर्याच्या भुकेचा झाडपाला ओरबाडला
अंगाखांद्यावर खेळवला महारोग निरवली सावली
डोंगर तबेला थंड बंड उनाडलो दरी

रस्ते जगाच्या पाठीवर उमटलो वळ
दहा गावांच्या पाठीवर फटकारे फाटलो खारट
भाकलो भाकरी ओसाड उसवलो ऊन
वाटेनेच वाटा काढल्या मुक्कामी मुतलो
फजीत फोफावलो अतिथी यथावयव यथावकाश
देवाचे कमावले गारदी मागावर दहादा निभलो

प्रत्यक्षाच्या पलंगावर झोपलो वारस
विसरलो खप्पड कालफडे शेफारलो दाढीदिशा
आलो घादांत कुत्र्याना फेफरे शेजारती
बडवता भाकर बोटे बायांची गोसावी मोडलो
विनाभिंत काकडलो कोनाडे रानोमाळ दरवाजे
किरण उतरलो तळ्यात पाय चमकलो मासे

वेळेच्या अभावी जोगावलो जागोजाग
छपरावर त्रिपुटीच्या ओढवलो निःसंग भोपळे
अवतरणचिन्हे कोऱ्या वाऱ्यावर गाथा गुंग
अन्नान्न घरघरलो स्वयंभू ट्रॅक्टर
श्वास वाऱ्यांचे सुभेदार पृथ्वी योगायोग पावलांचा
चांदण्यांचे सावरलो तोल जिथे आकाश तिथे अंग

नक्षत्रे खाजलो मरणाच्या केसात उवा
दिगंतरात बुडाल्या घागरी हरपले दहा दोर
जरा डगमगलो दिशांच्या काठावर नागवा रहाट
अकस्मात नव्हतो वस्तुमात्रास पारावार
अकस्मात निघालो कानातून भुंगे
अकस्मात उचलले पाय प्रत्येक वाटेवर

रस्ते गेलो गावामागून दुभंगत गाव
पडलो फौजदारी मिशाना कोंडे
प्रत्येक वेशीवर टांगलेला अगोचर हत्ती
पाहता पाहता अविचित्र झाली दृष्ट्युत्पत्ती
उडालो धडधडीत बाजारपेठांवर आगीचे फेटे
विश्वाच्या मशिनीवर चढलो कालातीत खबर

झालो बलात्कार मायेच्या मढ्यावर सूर्यांची गॅंग
चौपन्न पिसलो नकाशे उडालो रंग
पांढरी फटफटलो चित्रे झालो शुभ्र आकडे
शुभ्र वनराया शुभ्र सारे वारे
शुभ्र रेल्वेलायनी शुभ्र डोंगरदऱ्या शुभ्र नदीनाले
शुभ्र ईश्वरी उतारी शुभ्र हात हुकमाचे

मुंबईनं भिकेस लावलं
कल्याणला गूळ खाल्ला
ज्या गावाला नाव नव्हतं
पण एक धबधबा होता
तिथं एक ब्लँकेट विकलं
अन पोटभर पाणी प्यालो

पिंपळाची पानं चघळत
नाशकापर्यंत आलो
तिथं तुकाराम विकला
अन वर खिमापाव खाल्ला
जेव्हा आग्रारोड सोडला
तेव्हा एक चप्पल तुटलं

ओहोळात नीट आंघोळ केली
अन पहिलंच दार ठोठावलं
तिथं भिक्षा मागितली
अन गावाबाहेर पडलो
झाडाखाली पोट भरलं
पण तहान भागली नाही

एक गाडीवाला होता
त्याला नावगाव सांगितलं
गाडीवाला म्हणाला
जळो जिणे वगैरे
पुढं त्याच्या मळ्यावर
थंडगार पाणी प्यालो

नंतर आलं रोटेगाव
तिथं पंचायत भरली
अन देवळात कुत्रा मेला
रात्रभर कण्हत ओरडत
अंधारात अन उशाशीच
ते मढं ओढून नेलं

तिथं भाकरी मिळाली
पण एक बाई मुतत होती
ती अंधारात दिसली नाही
ती म्हणाली रांडेच्या
भाड्या डोळे फुटले का
भोसडीच्यांना भाकरी

वाटेवर गुऱ्हाळ दिसलं
तिथं ऊस मागून खाल्ला
विष्णुक्रांतावर हगलो
कडुनिंबानं पुसलो
रस्त्यात विडी सापडली
ती खिशामधे ठेवली

खूप रखडंपट्टी केली
त्या वर्षी दुष्काळ होता
एक मेलेला बैल पाह्यला
एक टेकडी चढून गेलो
टेकडीवरच्या देवळातून
नवसाचा पैसा घेतला

कोपरगाव मोठं तिथं
स्टॅलिन मेल्याचं वाचलं
कोपरगाव मोठं तिथं
भीक मागायला शरमलो
अन पाच दारं ठोठावली
तर अर्धी मूद मिळाली

धूळधुवट डोसकं दाढी
टाळक्यावर उन्हाचा घण
रात्र फरशीवर काढली
म्हणून खाजणारं ढुंगण
पावलात ठोकलेली यात्रा
पत्र्यासारखी तापलेली

जांघेत गोळा झालेलं
धोतर सारखं करायला
थबकलो दोन मैल स्टेशन
पुढं गाव तीन मैल मागं
तेव्हा घाम डोळ्यात गेला
आणि एक चित्र दिसलं

रस्यास लागूनच कुंपण
आत सारवलेलं अंगण
एक झोपडी एक म्हातारा
दारात उभी सून की कोण
तिथं मागितलं पाणी
ते ओंजळीनं प्यालो

ओल्या कोपरानी पाह्यला
सगळाच प्रेमळ म्हातारा
शुभ्र चांगुलकी दाढी
सोपे समाधान डोळे
अर्धा अधिक कातरलेला
पुढ्यात राकेलचा डबा

न मागता मिळालेली
कांदाभाकर खाऊन उठलो
ढुंगणाखालची हॅवरसॅक
उचलून पाठीवर घेतली
मग दोन मैल विचार केला
अन परतायचं ठरवलं

# चरित्र

नाळेला गाठ मारून सुईण म्हणाली
पेढे आणा हो पेढे आणा
कानाला सुई टोचून सोनार म्हणाला
दोन रुपये झाले दोन रुपये
दंडाला देवी टोचून नर्स म्हणाली
अजिबात दुखत नाही अजिबात

बुलीला पट्टी लाऊन बबन म्हणाला
तुझ्यापेक्षा माझं मोठ्ठाय तुझ्यापेक्षा माझं
पाठीवर गुद्दा मारून बबन म्हणाला
तुझ्या बापाची न् माझ्या बापाची कुस्ती लागली तर
घोट्यावर लाथ मारून बबन म्हणाला
रड्डुबाई कुठला रड्डुबाई

पावलाला पाऊल लाऊन बनी म्हणाली
सायकल सायकल खेळूया सायकल सायकल
पोटाला थुंकी लाऊन बनी म्हणाली
डॉक्टर डॉक्टर खेळूया डॉक्टर डॉक्टर
कुशीचा चिमटा घेऊन बनी म्हणाली
पांघरुणात ये पांघरुणात

डोक्याला चापट मारून एक मास्तर म्हणाला
तेतीस अडचे किती तेतीस अडचे
कानाला पिचकी मारून एक मास्तर म्हणाला
शेफील्ड गाव कुठाय मग शेफील्ड गाव
मांडीवर हात ठेऊन एक मास्तर म्हणाला
आंबेवनात चल आंबेवनात

मुंडी मुरगाळत न्हावी म्हणाला
हालू नका साहेब हालू नका
छातीला टेप लाऊन शिंपी म्हणाला
एकतीस इंच फक्त एकतीस इंच
पाय बुटात कोंबत चांभार म्हणाला
घालून घालून सैल होईल घालून घालून

पाठीवर चढून पोरगा म्हणाला
घोडा घोडा हैक हैक घोडा घोडा
पोटावर पाय देऊन बॉस म्हणाला
इलाज नाही मिस्टर नेने इलाज नाही
लंड पकडून बायको म्हणाली
कापून टाकीन एक दिवस कापून टाकीन

गोटीवर लाइट मारून एक डॉक्टर म्हणाला
हायड्रोसिल नक्कीच हायड्रोसिल
पावलाला पिन टोचून एक डॉक्टर म्हणाला
महारोग नक्कीच महारोग
पोटावर चापटी मारून एक डॉक्टर म्हणाला
अल्सर अल्सर नक्कीच अल्सर

पायावर पाय देऊन एकजण म्हणाला
सॉरी यार सॉरी
डोळ्यात छत्री घालून एकजण म्हणाला
माफ करना भाई माफ करना
अंगावर ट्रक घालून एकजण म्हणाला
दिखता नही मादरचोद दिखता नही

तू यक्षिणी म्हणे        सवालाख चांदण्या        निघाल्या तुझ्यातून
केल्यास अंगावेगळ्या
सोडून गेल्या तुला

म्हणून अंग हलकं
दगडी अंग हलकं        तुझं बोट मघाचं        नाही मांडीत भुणभुण
नाही उरात गजबज
नाही खांद्यात दगदग

म्हणून हलकाहलका        तुझा दगडाचा देह        अन समाधान पोवळं

तू यक्षिणी म्हणे
तू जोगीण म्हणे        किंवा जोगेश्वरी
सफेद रेड्यावरील        किंवा तू जाच
जा ग
सफेद रेड्यावरून

दोनी बाजूना दोन
विशाल सरोवरं
नि तू चालली आहेस
चिंचोळ्या वाटेनं                    सफेत रेड्यावरून
मधेच मधून मधून
मध्यस्थ मधोमध
म्हणे
पण म्हणजे तू                    चक्कच जोगेश्वरी

तू यक्षिणी म्हणे
किंवा जोगेश्वरी
म्हणजे खंडोबा कोण
तर पर्यायानं मीच

म्हणजे मीच खंडोबा
तर मी चालल्लोय म्हणे
पांढऱ्या घोड्यावरून
तीन पायांचा घोडा
तर मी चालल्लोय म्हणे
पांढरा डोंगर चढून
तर मी चालल्लोय म्हणे
उंच उंच उंच

पांढऱ्या घोड्यावरून
पांढरा डोंगर चढून
तीन पायांचा घोडा
म्हणजे खंडोबा कोण
तर पर्यायानं मीच

इतक्यात कडा तुटतो
पांढरा कडा तुटतो

# चोर

चोर गेले छपरावरून छपरावर वेलांच्या
उड्याना अंगं नव्हती म्हणून उद्यांच्या गुळ्या झाल्या
परवांची तोरणं चोर डोक्यावरनं गेले
चुकून मागं ऱ्हायलं एक पाऊल एक काचेचं कौल
लोक गावाबाहेर पडले पाठी मडक्यात ऱ्हायल्या
सोन्याच्या मुठी खिडक्यादारं खुली
किल्या चघळत लठ्ठ कुलपं खुशाल घरोघरी
झोपाळ्यावर पडून ऱ्हायली लोकानी गाव सोडला
उघड्यावर बिऱ्हाडं थाटली परांजपे मास्तरांची सून
जांभळीच्या झाडाखाली बाळंत झाली
चौकीवर आळस देत रात्रपाळी पोलीस
खिडकीबाहेर नजर फेकतो शेवग्याच्या झाडावरून
लटकते सकाळ चोराची लंगोटी
बदलीला क्षेमालिंगन देताना रात्रपाळी पोलिसाला
एकदम भडभडून येतं बाळबाळंतीण सुखरूप

# काय डेंजर वारा सुटलाय

अरे तुझी टोपी
तुझी टोपी गेली खड्डयात
कपाळ पहिलं संभाळ
काय डेंजर वारा सुटलाय
डोसक्यात कचरा
धूळ धूळ डोळ्यात

साहेबाची खिडकी फुटली
गादीवर काचा काचा
आपोआप गुंडाळतोय
पंजाब्याचा गालिचा
पार्शिणीचा फ्लावरपाट
गडबडा लोळतोय

सिंधिणीच्या दांडीवरली
म्हागडी नायलॉन साडी
चालली वाऱ्यावरती हवाई झाज
नवव्या मजल्यावरल्या
बंगाल्याचा लेंगा लगेच
लागला तिच्या पाठी

खापराना फेफरं भरलं
फडफड करतायत पाखरासारखी
कुलकर्ण्यांच्या भिंतीवरल्या
डिगऱ्या ठिकऱ्या फरशीवरती
नाऱ्या नाऱ्या तुझा बाप
सटकला की फोटोमधनं

मैदानावर जिकडंतिकडं
एसेस्सीचे पेपर
धावत्या मर्सडीजवर
कडकडकडाट झाड पडलं
प्रोफेसरसाहेब तुमची
कविता गेली उडत

पळा पेंटर
व्हाऊदे रंगाचं डबडं
झ्यायरातपत्रा खडखड करतोय
तुम्हीच रंगवलेली पंचवीस फुटी हेलन
तुमच्या बोकांडी बसणाराय
ढेंगात मानगूट पकडणाराय

मास्तर मास्तर बघा कसा
हिसडे मारतोय भिंतीवरती
भारताचा नकाशा
गेला उडत खिडकीबाहेर
डोंगरासकट नद्यासकट खुंटीसकट
गेला सरळ आकाशात

*Patient is RH positive*

–

बबन, ही घे मुताची बाटली
छगन, हा घे गुवाचा डबा
आणि बॉंबे हॉस्पिटलात जा

जाताना शॉर्टकट घ्या
आज शुक्रवार आहे
उद्या शनिवार असेल

आणि सई
तू पण त्यांच्याबरोबर जा हो
आणि येताना थर्मासभर रक्त घेऊन ये

मूत भूत लूत
पळा पळा पळा
सोमवार मंगळवार बुधवार गुरुवार शुक्रवार

शुक्रवार    शुक्रवार    शुक्रवार
शुक शुक शुक शुक
झुग झुग झुग झुग

*—पँट भी निकालना पडेगा क्या ?*
*—सब कपडा.*

हजाम दारात उभा राहताच खोलीचा चौकोनीपणा वाढतो
आणि बाहेरील अंधाराचा दाब
प्रत्येक भिंतीवर तिची लांबीरुंदी लिहिल्यासारखी ठळक दिसते
प्रत्येक कोपरा स्वीकारतो प्रकाशाचा सेटस्क्वेअर

खिडक्यांना पडदे आडवे येतात
आणि हजाम मेणकापड झटकतो
त्या एकाच झटक्यात आपल्याला कळून येतं
की ज्या इलेक्ट्रिसिटीचे माणसावर एवढे उपकार आहेत
ती खोलीशी एकनिष्ठ असते
माणसाशी नव्हे

ढुंगणाला पोटऱ्यांना पाठीला जाणवतो
मेणकापडाचा स्पर्श ओशाळ गारवा
हजामाच्या खांद्यापासून गुडघ्यापर्यंत हिरवट एप्रन

गरम पाण्यात ब्रश खदबळला जात असताना
एक थेंब आपल्या पोटावर पडतो
आपण काखा वर करतो
आणि हात डोक्याखाली घेऊन पाहतो एकटक
वर भरभरणाऱ्या पंख्याची गदगदणारी गदा

ब्रश फसफसतो
काखेत खेकसतो फेसाळत छातीवर
सैरावैरा होतो पोटावर लयलूट
मांडी थापटतो जांघांना ढुशा मारतो
वस्तरा चुरचुरतो

मग कुशीला वळून आपण ऐकतो
उशीत दळणारा पंखा
डोळ्यापुढे पाहतो स्वच्छ निळी भिंत
पाठीवर वस्तरा धावतो

हीपण शस्त्रक्रियाच

घोकटी गुंडाळून हजाम निघून जातो
आपली आणि त्याची नजरानजर झालेली असत नाही

झोंबणाऱ्या अंगाभोवती आपण टॉवेल गुंडाळून घेतो
जगावर सांगितलेला हक्क
झाटावरदेखील शाबीत झालेला नसतो

*—हो गया ?*
*—हो गया.*

मी मेणाचा भावला
चिकणा हिजडा
भादरलेला

दरबारी हजामानं
हिरेजडित वस्तरा उघडताच
मी काखा वर केलेल्या

मांड्या फासटलेल्या
पोटावर सुगंधी साबण फेसाळताच
माझा श्वास मंद झालेला

रंगमहालात मी उताणा उखाणा
पालथ्या बिलोरी छतात किलावर गुलाम
बदामी होणारा सलामत

नसत्या झुंबराला
पेटवतो
माझा दुबारा सलाम

मी कुशीत वळेन
तेव्हा माझी विकतची पाठ
ओलावेल गुलाबपाण्यानं

आणि माझ्यावर अंधार पडेल
सुरकुतलेल्या राजाप्रमाणं
लटलटत

मेणाचा मृत्युंजय भावला
उच्चारेल मृत्याचा राजलंड
बोबडा

*Temperature Normal. Pulse, respiration satisfactory.*

गुढघे ताठ
करून दोन पाय
समोर कठड्यावर ठेवतो
आणि मागं आरामखुर्चीत रेलतो
तेव्हा माझ्या दृष्टीनं पाह्यलं तर मुंबई बुडालेली असते

डोळ्यांना
दिसते उचल
कठड्याच्या सपाटीनं
घेतलेली मुंबई बुडालेली
एरियल्स गच्च्या धुराडी पाण्याच्या टाक्या

किलकिल्या
पापणीत घेतो
पाहून वरच्यावरती आकाश
संधिप्रकाशात सैल पडलेलं
नि आपापल्या परीनं उडणाऱ्या चिमण्या कावळे

कानानं
ऐकतो चिवचिव
नि डोळ्यानं पाहतो चिमणी
त्यांचा संबंध असेल नसेल जाऊ द्या
ही कठड्याची आडवी रेघ नि ही मधोमध पावलांची फुली

*Gastrojejunostomy + Vagotomy + Appendicectomy + Hydrocele*

मी किती स्वच्छ झालो आहे
मला हातगाडीवर आडवे टाका
व माझ्यावर शुभ्र चादर पसरा

घशापासून गुडघ्यापर्यंत
माझे केस खरडून काढलेत साफ
माझं पोट पंधरादा विसळून काढलेलं आहे
एनिमा देऊन माझी आतडी धून टाकलेली आहेत
मला धुतल्या तांदळासारखं वाटतंय

मला तो रुमाल देता का
माझ्या नाकात जरा शेंबूड आहे
तो मला शिंकरू द्या

मग मला हातगाडीवर आडवे टाका
आणि माझ्यावर ती शुभ्र चादर पसरा

किलकिल्या
पापणीत घेतो
पाहून वरच्यावरती आकाश
संधिप्रकाशात सैल पडलेलं
नि आपापल्या परीनं उडणाऱ्या चिमण्या कावळे

कानानं
ऐकतो चिवचिव
नि डोळ्यानं पाहतो चिमणी
त्यांचा संबंध असेल नसेल जाऊ द्या
ही कठड्याची आडवी रेघ नि ही मधोमध पावलांची फुली

*Gastrojejunostomy + Vagotomy + Appendicectomy + Hydrocele*

मी किती स्वच्छ झालो आहे
मला हातगाडीवर आडवे टाका
व माझ्यावर शुभ्र चादर पसरा

घशापासून गुडघ्यापर्यंत
माझे केस खरडून काढलेत साफ
माझं पोट पंधरादा विसळून काढलेलं आहे
एनिमा देऊन माझा आतडी धून टाकलेली आहेत
मला धुतल्या तांदळासारखं वाटतंय

मला तो रुमाल देता का
माझ्या नाकात जरा शेंबूड आहे
तो मला शिंकरू द्या

मग मला हातगाडीवर आडवे टाका
आणि माझ्यावर ती शुभ्र चादर पसरा

## *Glucose/Saline 500 cc*

सिस्टर कॅरोलला सर्जन ग्रिफिथच्या मिठीत
पस्तिसाव्या पानावर सोडून
सिस्टर सेथना माझ्या उशाशी येते
आणि सिरिंजमधे औंसभर पाणी घेते

नाकातून निघालेल्या नाळेच्या कंसात
दूर खुर्चीत बसलेली आई दिसते
मांडीवर उघडा दासबोध डोळ्याला चष्मा
घशात जाणवते एक थंडगार उद्‌गारचिन्ह

इंट्रावीनसची पाचवी बाटली रिकामी होते
आणि सिस्टर सेथना स्टँडला सहावी लटकावते
ही शेवटची ‘ I love you Carol. ’
‘ And I love you too ’ कॅरोल म्हणते

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २३०१
ग्रंथ २१५१४ ३१।७४
शाखा (स्थळ प्रत)

एक दोन तीन चार पाच : काचेच्या
बोटभर पोकळीत पुनःपुनः जमणारा
सेलाइनचा थेंब विश्वाचं केन्द्र होऊन राहिलाय
उजवा हात सबंध आखडून गेलाय

टेबलावर रामदासाला उताणा ठेऊन
आई पलंगाशेजारी येऊन उभी राहते
सेलाइनचा तेरावा थेंब टचकन उमटतो
आणि तिच्या उजव्या गालावर चमकतो

पाय चेपू का ? मी म्हणतो नको
चष्म्याच्या डाव्या काचेतून तिचा डोळा दिसत नाही
फक्त एक उघडी खिडकी आकाशाची मळभ
कदाचित पक्ष्याचा एक ठिपका तरळून जातो

हवेतल्या हवेत रामदास कागदी लाथा झाडतो
जन्म दुःखाचा अंकूर जन्म शोकाचा सागर
जन्म भयाचा डोंगर चळेनासा
आई परत जाते व रामदासाला मांडीवर घेते

इंट्रावीनसच्या थेंबाथेंबीत माझं मात्र घड्याळ झालंय
कधीही न संपणारं कितीही न वाजणारं
निशिगंधाचा बूके कुणी पाठवलाय तो
सिस्टर सेथना फ्लॉवरपॉटमधे अरेंज करतेय

Do you like flowers ? ती विचारते
Not particularly मी म्हणतो
इतक्यात माझा भाऊ येतो चेहरा फुललेला
इंडियानं टेस्ट जिंकली न्यू झीलंडचा धुव्वा

लघवी होईलसं वाटतं मी सिस्टरला सांगतो
आई व भाऊ बाहेर जातात सिस्टर दार बंद करते
मुताचं भांडं घेऊन मी दहा मिनिटं पडून राहतो
होत काहीच नाही

*Ryles tube removed.*

एक गुलाबाची कळी
ढकलते माझ्या नाकात रबराची नळी
एक झगेवाली पूर्णिमा
देते मला मागच्यामागे एनिमा
एक वाजवते बीन
माझ्या दिमतीला दाशा तीन

गालावर ओघळते लाळ
तेव्हा एक पुसते कपाळ
पाठीला येतो घाम
तेव्हा एक लावते कानाला बाम
आणि तिसरी
वाजवते बासरी

*Passed 4 stools—offensive—unformed—urine scanty*

एवढसं तोंड एवढेसे डोळे एवढसं नाक
अन एवढाल्या मिशा त्या कापून टाक कापून टाक कापून टाक
**who will call you a man of thirtythree**
मी तर म्हणेन तू सतरा वर्षाची छोकरी
खरंच तुझी उमर काय
किती काटकोळे पाय
मूठभर गळा वीतभर छाती
अरुण तुझं तोंड उघड सांग तुला दात किती

एवढी मोठी मिशी
तुझ्या बायकोला चालते तरी कशी
एक माझा पेशंट होता प्रोस्टेटची केस
काय त्याचं नाव हां हृषिकेश हृषिकेश
Such big whiskers
O he was a laugh
पण एका रात्री
मी हळूच घेतली कात्री
अन कापून टाकल्या साफ
अर्थात त्याची बायको झाली खूष
पण तो एवढा भडकला की O my gosh

दोन महिन्यानी दिसला तेव्हा मला बघून आठ्या
आणि व्हिस्कर्स बघाव्या तर पहिल्यापेक्षा मोठ्या

*You will have to wear a corset for at least 3 months.*
—Dr. Mehta FRCS

घाल नायलॉनचं कॉर्सेट मर्दा
चढव नायलॉनच्या निकर्स
महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स
उधळेल तुझ्यावर खुर्दा
जे आर डी टाटा
घेईल तुझ्या गालाचा चिमटा
बिर्ला
म्हणेल Come in my parlour
एकांतात गोयंकास
दाखव पोटावरचा स्कार
म्हण पार्लमेंटात लावणी
दाखव मेंबरांना लोणी
भर पैक्यानं गोणी
डायनर्स क्लबचं कार्ड
कुणी फडकावलं तर फाड

तुझ्या पायातलं स्टॉकिंग केसाळ जाळी
पाहून शास्त्री देतील नंदांना टाळी
जरा ढुंगण हलव
जरा दुनिया झुकव
तुझ्या मांडीवरचा तीळ
पाहून दगॉल घालेल शीळ
युनोत कर स्ट्रिपटीज
चुकव पृथ्वीची बेरीज
यू थांत-
ला दे दृष्टांत
आणि खोच गार्टर-
खाली यू एन चार्टर
मार ॲटम बॉंबच्या दोंदावर हळूच टिचकी
मग जगाला देऊ द्या एकच उचकी

*Sponged fully. Pt has 2 small boils on lt shoulder.*

एका मांजरानं माझं अंग चाटून साफ केलंय
त्या खिडकीचा पडदा जरा बाजूला केला
की बोरीबंदर आणि जी पी ओ यांच्या अधेमधे
मला सूर्य उगवताना दिसेल

सिस्टर लेविलाड
आता माझ्या ढुंगणाला टाल्कम पावडर लावतेय
आणि माझ्या झाटांचे खुंट
इलॅस्टोप्लास्टमधून परत उगवू लागलेत

ओम् मित्राय नमः
ओम् हिरण्यगर्भाय नमः

# रद्दी

तिवईवर रद्दीचा ढीगाय
त्याच्यापास्नं
जरा सांभाळूनच ऱ्हा

रद्दीला डिस्टर्ब करू नको
मला माहिताय
पानोपानी साप व्यालेत

तिकडं बघू नको
पेपरांचे कोपरे
वाऱ्यानं कापरे झालेले नाहीत

चळथींत चुळबुळ चाललेली आहे
सापाची पिलं
माना वळवून तुझ्याकडं बघतायत

तो कोपरा फणा काढतोय
जिभल्या चाटतोय
तिकडं लक्ष देऊ नको

डोळे मिटून घे
उद्या सकाळी
वाटलं तर रद्दी विकून टाक

## खेकडे

ते बघ ते बघ
दोन खेकडे बघ ते
कसे टपलेत

कुणावर टपलेत म्हणून काय विचारतोस
अरे तुझ्यावर
बघतायत बघ कसे

तुझ्याकडं बघतायत
आणखी कुणाकडं
कसे एकटक बसलेत

एक हिकडं एक हिकडं
बरोबर १६० अंशाचा कोन करून बसलेत
एक डावीकडं एक उजवीकडं

डोळे खाणारायत तुझे
घाबरलास कशाला
म्हणजे अगदी आत्ताच खाणारायत असं नाही

आज नाहतिर उद्या
उद्या नाहीतर परवा
नाहीतर आणखी घा वर्षांनी रे

त्याना काय
त्याना कसली घाई आहे
बघून घेतील सावकाश

इकडं बघ इकडं
सगळीच मुंडी हलवू नकोस
बुबळं इकडची इकडं कर

दिसतोय का एक खेकडा
सबंध नसेल दिसत एवढ्यात
अर्धा दिसतोय ना

आता इकडं बघ इकडं
अरे बुबळं इकडं कर
इकडं पण अर्धा दिसतोय ना

नाहीतर नुसते डेंगे दिसत असतील रे
आहे की नाही
दिसेल आख्खा खेकडा पण दिसेल

अजून टाईम आहे रे
त्याना काय दुसरा धंदा आहे का
हेच त्यांचं काम

अरे हे तुझेच खेकडे
अगदी स्वताचे
त्याना कुठं दुसऱ्यातिसऱ्याचे डोळे खाण्यात इंट्रेस्टाय

तुझ्या डोक्यातनंच हे उपटले
लानाचे मोठे झाले
बघ कसे लड्डू बसलेत

डोळे खाणारायत तुझे
घाबरलास कशाला
म्हणजे अगदी आत्ताच खाणारायत असं नाही

आज नाहितर उद्या
उद्या नाहीतर परवा
नाहीतर आणखी घा वर्षांनी रे

त्याना काय
त्याना कसली घाई आहे
बघून घेतील सावकाश

इकडं बघ इकडं
सगळीच मुंडी हलवू नकोस
बुबळं इकडची इकडं कर

दिसतोय का एक खेकडा
सबंध नसेल दिसत एवढ्यात
अर्धा दिसतोय ना

आता इकडं बघ इकडं
अरे बुबळं इकडं कर
इकडं पण अर्धा दिसतोय ना

नाहीतर नुसते डेंगे दिसत असतील रे
आहे की नाही
दिसेल आख्खा खेकडा पण दिसेल

अजून टाईम आहे रे
त्याना काय दुसरा धंदा आहे का
हेच त्यांचं काम

अरे हे तुझेच खेकडे
अगदी स्वताचे
त्याना कुठं दुसऱ्यातिसऱ्याचे डोळे खाण्यात इंट्रेस्टाय

तुझ्या डोक्यातनंच हे उपटले
लानाचे मोठे झाले
बघ कसे लड्डू बसलेत

बसलेत आज बघू
उद्या बघू करत
कपाळावेगळे झाल्यापास्नं

तुझेच डोळे खाणारायत
तू म्हणशील तेव्हा
की झालं काम

संबंध मिटला

# बिल्डिंगा

एक बिल्डिंग प्रथम जागच्या जागी झुलाय लागते
मग जरा लवून गुलमोराच्या बुंध्याला गंडस्थळ घासते
आता मुळाखाली सुळे घालून सगळं झाडच गदगदा हालवतेय

अकरा नंबरचं उदाहरण बघून चवदापण बिथरली
तेराचंही लक्षण काही ठीक दिसत नाही
ते बघ तिचे डोळे फिरले तोंडाला फेस येतोय

खिडक्या आसडे देतायत भिंती एकमेकात मिसळतायत
किलाचंदच्या बेडरूमची भिंत सरकली बघ डावीकडं
पटेलच्या ड्राइंगरूमच्या भिंतीनं हळूच येऊन तिची जागा पटकावली

मुकेश मिलची चिमणी जरा हालल्यासारखी वाटली
मुकेश मिलची चिमणी एकदम मुसळासारखी वर गेली
मुकेश मिलची चिमणी आता गिरणी कुदायला खाली आली

दरम्यान अकरा नंबरलापण गचके बसाय लागले बघ
आता डचमळतेय प्रचंड रणगाड्यासारखी
गच्चीवरलं घरकुल चक्करलं गरगरतंय उलटसुलट टरेटसारखं

बारटक्क्यांच्या बेडरूमच्या खिडकीतनं बाहेर आलेली
घडघडीत पंचावन्नफुटी तोफ चौफेर क्षितिज हुंगतेय

# कांबळं

पायगतीच्या कांबळ्यानं झडप घातली बघ
कांबळं पसरतंय अंगावर

दशा कशा शिवशिवतायत
काळी बोटं वळवळतायत

काळी लाट फुटली तुझ्या छाताडावर
काळी बोटं विणतायत तुझ्या गळ्याभोती हळूहळू

कसं वाटतंय
जरा गुदगुली झाल्यासारखं

काळ्या कढीची पाळ फुटली रे
फुटली फुटली फुटली

तुझ्या ओठावर एक काळं बोटाय
ओरडू नकोस ते बजावतंय

काळी बोटं जरा आवळ होतायत गळ्याला
लाथाड कांबळं झटक

आचके दे

प्रत्येकाला अमुक इतके गाल असायला पायजेत
असं कुठाय
किंवा इतकेच कुले पाहिजेत
असंही नाही

नाकडोळे कुठं असावेत
कुठल्या प्राण्यांचे
आणि त्यानी कितीदा बदलावं
यालाही काही नियम नाहीत

ते ठीकाय
कारण तुम्ही ढग
तुम्ही एका खिडकीतनं येणार
अधांतरी लोळत लोळत

पोटातल्या खांद्यातल्या गालातल्या गालात हसत हसत
गुडघ्यातल्या डोळ्यातल्या नाकातली मेकडं काढत काढत
बगलेतल्या गांडीतल्या तोंडातले दात टोकरत टोकरत
तर या की

माझं म्हणणं एवढंच
की तुम्ही जसे या खिडकीतनं आत आलात
तसे त्या खिडकीतनं
तुम्ही बाहेर का जात नाही

म्हणजे मला निदान
सकाळ होईपर्यंत
छताकडं तरी बघता येईल
निवांतपणे

## गणपती

आण तुझे गणपती
सोड माझ्या डोळ्यात

रांगेनं उभे न्हा म्हणावं
सगळ्यांचं विसर्जन करणाराय

# मलखांब

चढ माझ्यावर
टांग मार मला

घाल माझ्या गळ्यात
तुझा गळा तुझ्या तंगड्या

करून घे कडकडाट
नाचव ज्या नाचवायच्यायत त्या विजा

सोड लोळ माझ्या टकलावर
लाव मला विजेच्या शेंड्या

मी उभाय इथं मजबूत
पोलादी मलखांबासारखा

## पाव

वेडाच्या टेबलावर
बैस पावासारखा

कागदाचा कोष फाटेल
तेव्हा सगळे स्लाइस गडबडतील

एवढंच
आधीचाच कापलेला असशील

## चट्टामट्टा

एक घास काऊचा होशील
एक चिऊचा
एक फडफडणाऱ्या पेपराचा

स्टूल येईल तरसासारखं एकदम तिरकसून
रानडुकरासारखा रेडिओ मुसंडी मारेल
ढोलीतनं जिभल्या चाटत बूट बाहेर येतील

हँगर झडप घालतील
वारुळातनं नळ येतील सरपटत
धुणं वाळत घालायचे चिमटे टोळासारखे टणाटण

एकदम सगळ्यांचीच
जेवायची वेळ झालेली असेल
सगळ्यानाच एकदम उपास सोडायचा असेल

थांब तरी कुणाला म्हणशील
बघता बघता
वस्तूंच्या रक्तात साखर होऊन जाशील

## भूपाळी

उपड खुंट
आवर पसारा

गुंडाळ तंबू
खुडून घे राहुट्या

आता उठव छावणी
पुरे सोंग

किती ट्रिका करून दाखवशील
थोड्या असू देत शिल्लक

घड्या करून सगळ्या
सावल्या पेटाऱ्यात भर

आत डांबराच्या गोळ्या
ठेऊन दे

किती दाखवशील बुजगावणी
किती अस्वलं भिडवशील अंगाशी

किती कोरशील रात्रीत बदलती लेणी
किती भोवंडशील भोताली भौरूपी गुहा

किती राक्षस टांगशील छताला
किती भिंतींतनं घेशील गारगॉइली झेपा

किती वस्तूंच्या मोज्यात पंजे खुपसून
करशील हातवारे टिवल्याभावल्या

किती दाखवशील
वस्तुमात्रातून काढून जिभा

या खेळायच्या वस्तू नव्हेत
इथं कशालाही हात लावायचा नाही

आता सकाळ झाली
मला झोपू दे

## ॲनिमेशन

स्टँडर्ड बॅटरीची निऑन साइन
दिसली रे दिसली
की मी झटकन तोंड फिरवतो
कारण त्यातनं MORE POWER अशी अक्षरं
वसकन बाहेर पडणार
हे मला माहीत असतं

ट्यूबमधनं टूथपेस्टचा ओंडका बाहेर येतो
स्क्वॉशच्या बाटल्या फेर धरतात
विमचा डबा टुणकन उडी मारतो
रॅपर उमलून ब्लेड बाहेर पडतं
किंवा कपड्यांच्या आपोआप घड्या होतात
तेव्हा मी गपकन डोळे मिटून घेतो

वॉर्नर ब्रदर्सचा चलाख W
काळ्या पडद्यावर झटपट साकार होतो
तेव्हा सार्वजनिक अंधारात
एक ओळखीची भीती
माझ्या गुडघ्याला गुडघा घासते
आणि माझ्या पँटची झिप चाचपते

## काळा रुमाल

डोळ्यावरनं रुमाल बांधून घे
काळा रुमाल
त्यातल्या त्यात बरा

नाहीतर काळी मखमल आण
त्याची एक अशी चार बोटं पट्टी कापून घे
आणि दोन बाजूनी दोन नाड्या लाऊन घे

नाहीतर इलॅष्टिकची पट्टी शिऊन घे मागनं
त्यात कायाय बायको शिऊन दील की तुला
अरे दोन मिंटाचं काम

डोळ्यावरनं पट्टी बांध
आणि आरामखुर्चीत बसून व्हा
राजासारखा

आरामखुर्ची आहे की नाही घरी तुझ्या
आहे ना
मग झालं तर

नसेल आरामखुर्ची
उशी असेल
जमीन असेल

तोंड वर करायचं
डोकं शांत ठेवायचं
आणि पडून ऱ्हायचं

रात्रंदिवस नको
कामधंदा पण करशील की नाही
पण सवड काढून

## तक्ता

अननस आई इजार आणि ईडलिंबू
उखळ ऊस आणि एडका
सगळे आपापले चौकोन सांभाळून बसलेत

ऐरण ओणवा औषध आणि अंबा
कप खटारा गणपती आणि घर
सगळ्यांच्या स्वताच्या मालकीच्या जागा आहेत

चमचा छत्री जहाज आणि झबलं
टरबूज ठसा डबा ढग आणि बाण
सगळे आपापल्या जागी ठाण मांडून बसलेत

ग्रंथालय
ना. क्र. 2307
29598 31/02
शाखा (स्थळ प्रत)

तलवार थडगं दौत धनुष्य आणि नळ
पतंग फणस बदक भडजी आणि मका
यांचा एकमेकाला उपद्रव होण्याची शक्यता नाही

यज्ञ रथ लसूण वजन आणि शहामृग
षटकोन ससा हरीण कमळ आणि क्षत्रिय
या सगळ्यानाच अढळपद मिळालंय

आई बाळाला उखळात घालणार नाही
भडजी बदकाला लसणाची फोडणी देणार नाही
टरबुजाला थडकून जहाज दुभंगणार नाही

शहामृग जोपर्यंत झबलं खात नाही
तोपर्यंत क्षत्रियपण गणपतीच्या पोटात बाण मारणार नाही
आणि एडक्यानं ओणव्याला टक्कर दिली नाही

तर ओणव्याला थडग्यावर कप फोडायची काय गरजाय

REFBK-0021594

REFBK-0021594